# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/महाडीबीटी पोर्टल/२०१८/4514 दिनांक :- 22 OCT 2018

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सव तंत्रशिक्षण संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जाची छाननी करणे बाबत.
संदर्भ :- जा.क्र.तंशिविकापु/विवि/महाडीबीटी-२०१८/२०१८/४३७८ दिनांक ०९/१०/२०१८

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून मा.संचालक (आयटी) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई द्वारे नव्याने सुरु करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटीमहाऑनलाईन पोर्टल/MahaDBTMahaOnline Portal द्वारे तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे मार्फत खालील शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना (शासन निर्णय भाग-१) (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

या कार्यालयाने उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थाना महाडिबीटीपोर्टलद्वारे संस्थेच्या लिपिक/प्राचार्य यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेल्या अर्जाची तातडीने छाननी करणे बाबत सुचित केले आहे. तथापि अद्यापही ब-याच संस्थाचे शुल्क, शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर झालेले नाहीत.त्यामूळे विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये मंजूर शुल्क दिसून येत नाही. असे अर्ज संस्थेच्या लिपिक/प्राचार्य यांच्या लॉगीनमध्ये छाननीसाठी प्रलंबित आहेत.

**पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेचे शुल्क मंजुरी शुल्कनियामक प्राधिकरणाकडे प्रलंबित असल्यास असे शुल्क मंजुरीची वाट न बघता संस्थेच्या लिपिक/प्राचार्य यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले सर्व अर्जाची तातडीने छाननी करुन नियमाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विभागीय कार्यालयाकडे मंजूरीसाठी ताबडतोब अग्रेषित करावेत. तसेच त्रुटी असलेले अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये परत पाठविण्यात यावेत.**

**कोणत्याही परिस्थितीत संस्थेच्या लिपिक/प्राचार्य यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित अर्ज शिल्लक राहणार नाहीत याची संस्थेच्या प्राचार्यानी दक्षता घ्यावी.**

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे